## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. २०३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०४/२०१८

**१) मोटार सायकलची चोरी :–**

दिनांक १९/०४/२०१८ चे ११.०० ते १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीने पुतनीचे लग्न शंकर महाराज सावरी येथे असल्याने त्यानी आपली हिरोहोंडा स्पलेन्डर मोटार सायकल क्र. एमएच ३६ बी ०५८१ काळया रंगाची निळा पट्टा असलेली किंमती १५,०००/–रु. ची आश्रमासमोर ठेवलेलीअसता काणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने, फिर्यादी पुरुषोत्तम सहादेव सेलोकर वय ५२ वर्ष रा. केवटा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन हातबुक्यांने, दगडाने मारुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १८/०४/२०१८ चे २०.१५ ते २१.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी याचे शेतीचे मालकीचे वादावरुन आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे गालावर थापड मारुन त्यानंतर आरोपी क्र. १ ने फिर्यादीस बाजार चौकात बोलावले असता फिर्यादी व संघर्ष, घनश्याम असे मिळुन अनिरुध्द यांचे दुकानात गेलो असता तेथे हजर आरोपी क्र. २ ते ५ पर्यत व तेथील १० ते १२ लोकांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी व फिर्यादीचे आई वडील, मुलगा भाऊ यांना हातबुक्यांने, तसेच दगडाने मारहान करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी किशोर रामा रंगारी वय ४७ वर्ष, रा. देव्हाडा बुज यांचे तोडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम १४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) शेतीचे वादावरुन शिवीगाळ, मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १८/०४/२०१८ चे २०.१५ ते २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी याचे शेतीचे मालकी बाबत वाद असुन त्या वादावरुन आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादी व त्याचे आईला शिवीगाळ केल्याबाबत विचारले असता आरोपी क्र. १ व २ जवळ आरोपी क्र. ३,४,५,६,७,८ हे आलेत व शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी दिनेश पुसाराम साखरे वय ४२ वर्ष, रा. देव्हाडा बुज यांचे यांचे तोडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम १४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४)प्राण्यांना निदर्यतेने वागणुक देतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १९/०४/२०१८ चे ०३.०० वाजता दरम्यान यातील आरोपी क्र. १ व २ यांनी त्याचे ताब्यातील २० बैल एकुण किंमती ९१,०००/–रु. चे हे एका लांब दोराला बांधुन त्यांना वेदना होईल अशा प्रकारे बांधुन त्यास कोणत्यातरी चारा पाण्याची व्यवस्था न करता प्राण्यांना निदर्यतेने वागणुक देतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. मोदनकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ११(१)प्रा.नि.वा.प्र.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परतेकी पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**५) १० चाकी ट्रकचे धडकेत एकाचा मृत्यु व एक गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १९/०४/२०१८ चे १९.०७ वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपी १० चाकी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकल क्र. एमएच ३६ ए २७६२ ला धडक देवुन मोटार सायकल चालक रोशन भागवत भावे वय २८ वर्ष, रा. लाखांदुर यांचे मरणास व मागे बसलेला तेजस बंडुजी कार वय १६ वर्ष, रा. लाखांदुर यास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता व पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. ढोक यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३७८,३०४(अ)भांदवि. सहकलम १३४,१८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. बन्सोडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**६) गळफास लावुन युवकाचा मृत्यु :—**

दिंनाक १९/०४/२०१८ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील मृतक सुनील सहादेव माकडे वय २३ वर्ष, रा. डांबेविरली हा १५ दिवसा पासुन प्रकृती ठिक वाटत नसल्याचे सांगुन त्याने त्याचे मनावर परीणाम घेवुन स्वतःचे शेतावर आंब्याच्या झाडाला नायलॉन दोरीने गळफास लावुन मरण पावला आहे. असे फिर्यादी सहादेव सोमा माकडे वय ४० वर्ष, रा. डांबेविरली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन लाखांदुर करीत आहेत

**७) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिंनाक २८/०३/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक शंकर राजीराम कांबळी वय ३५ वर्ष, रा. ईटगाव हा पवनी वरुन गावी मोटार सायकलने जात असतांना सिंधपुरी टि पाईट वर मोटार सायकल ही स्लीप झाल्याने खाली रोडवर पडुन त्यास डोक्याला मार लागल्याने त्यास त्याची पत्नी सौ. शारदा कांबळी ने ग्रामीण रुग्णालय पवनी येथे उपचारा करीता भरती केल्याने तेथील डॉक्टर यांनी उपचार करुन पुढील उपचारा करीता रेफर केल्याने त्यास मेडीकल कॉलेज नागपुर ट्रामा सेंटर क्र. टी. जे. ७४७३६२ व दिनांक २९/०३/२०१८ चे ७.३९ वाजता भरती केले असता उपचारा दरम्यान वार्ड इंन्चार्जने तपासुन दिनांक २९/०३/२०१८ चे ०९.३० वाजता मृत घोषीत केल्याने मर्ग चे कागदपत्रात त्रृटया असल्याने पो. स्टे. एसडी नं. ५४/१८ मध्ये नोद घेवुन पो. शि. १२८६ याचे हस्ते पुर्तता करुन सदरचे कागदपत्र प्राप्त होताच सरतर्फे फिर्यादी पोहवा. कन्नाके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत.

**८) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

**अ)** दिनांक १९/०४/२०१८ चे १६.०० ते १६.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल वाहन ही बावनकर चौक तुमसर येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करुन मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी सफौ. शहारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**ब)** दिनांक १९/०४/२०१८ चे १६.०० ते १६.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल वाहन ही गंज बाजार तुमसर येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करुन मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. माहुर्ले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १९/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक— ०४, तीन सिटर वाहनाकरीता— ०६ ईतर वाहनांवरती — ९६ केसेस करण्यात आले आहे.

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ०७१८४२५४७०१**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.